दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ८८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२२ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# आमच्या मनानं घेतलाय ठाव, विमानतळाला दिबांचंच नाव!

- २४ जूनच्या आंदोलनाची जय्यत तयारी
- दि.बा.साहेबांच्या नावासाठी संघर्षाचा लढा कायम राहणार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**रविवारी मुंबईत झालेल्या बैठकीत राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हट्टामुळे दुसऱ्या फेरीची चर्चाही फिसकटली आहे. त्यामुळे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाला त्यांचा विरोध असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांनी घेतलेली हि भूमिका प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र आणि प्रकल्पग्रस्त गावांवर अन्यायकारी आहे. मुख्यमंत्र्यांच्या या हेकेगिरी भूमिकेला आमचा प्रखर विरोध असून प्रकल्पग्रस्ताचे लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासाठी घोषित करण्यात आलेले २४ जून रोजीचे सिडको घेराव आंदोलन कोणत्याही परिस्थितीत होणारच आहे, अशी रोखठोक भूमिका लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने मांडली. आंदोलन दडपण्यासाठी पोलीस प्रशासन अँक्शन मोडवर असेल तर आम्ही रिअँक्शन मोडवर असणार आहोत, असा खणखणीत आवाजही कृती समितीने दिला आहे.**

या पत्रकार परिषेदस कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार गणपत गायकवाड, कॉ भूषण पाटील पनवेल महानगरपालिकेचे उपमहापौर जगदिश गायकवाड, जे. डी. तांडेल यांच्यासह विविध संस्था संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणासंदर्भात रविवारी (दि. २०) मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेली लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची चर्चेची दुसरी फेरीही मुख्यमंत्र्यांच्या हट्टामुळे फिसकटली. मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून न घेता ते बैठकीतून एकदा उठून गेले. त्यामुळे काहीही झाले तरी 'दिबां'च्या नावासाठी आम्ही माघार घेणार नाही, असा निर्धार सर्वपक्षीय कृती समितीने व्यक्त केला. दरम्यान २४ जूनच्या आंदोलनाच्या धसक्यामुळे आंदोलन दडपण्यासाठी पोलिसांनी परवानगी नाकारली आहे त्याचबरोबर नोटिसा बजावण्याचे तर दुसरीकडे दिबासाहेबांच्या नावाला विरोध करणारे विविध क्लुप्त्या करत जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही, असे सांगून दिबासाहेबांच्या नावासाठी कितीही विरोध झाला तरी हे आंदोलन होणारच, असेही लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने यावेळी स्पष्ट केले.

तसेच पुढे म्हणाले की, प्रशांत ठाकूर, महेश बालदी व गणपत गायकवाड या तिन्ही आमदारांनी पोलीस आयुक्तांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्हाला अडवायचा प्रयत्न केल्यास आम्ही आत्मदहनाची वेळ आली तरी मागे हटणार नाही. आम्ही आंदोलनस्थळी जाणारच आणि तुम्ही जाऊ दिले नाही, तर रस्त्यात जे काही होईल त्यास शासन व पोलीस जबाबदार असतील, असेही ठणकावले आहे. ठाकरे सरकारच्या भूमिकेमुळे लोकं चिडलेली असून दिबासाहेबांच्या नावासाठी जनता जनता रस्त्यावर उतरणार आहे, आणि दिबासाहेबांच्या नावासाठी आम्ही केंद्रातही जाणार आहोत, असेही त्यांनी अधोरेखित केले.

२४ जूनचे आंदोलन करायचे हा आपला निर्धार पक्का आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मात्र तुम्ही आंदोलन करीत असाल, तर शिवसैनिकही रस्त्यावर उतरतील, अशी भाषा केली. अशा प्रकारे मुख्यमंत्री धमकी देतात हा लोकनेते दि. बा. पाटील व त्यांच्या कार्याचा अपमान आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता याविरोधात रस्त्यावर उतरेल. पोलिसांच्या आडून हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होईल, पण आपण ठाम राहायला हवे. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या सर्वांचे आराध्य दैवत आहेत. महाराजांच्या नावाने मुंबईत विमानतळ आहे. एका विमानतळाला नाव असताना तांत्रिकदृष्ट्या तेच नाव दुसऱ्या विमानतळाला देता येणार नाही. दिबासाहेबांच्या नावासाठी आज आम्ही मनसे प्रमुख राज ठाकरे यांची आम्ही भेट घेतली त्यावेळी त्यांनी त्यांची भूमिका महाराजांच्या नावाची मांडली आहे.

**: आ.प्रशांत ठाकूर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी बोलाविलेल्या बैठकीत आम्ही सर्वपक्षीय कृती समितीने विमानतळाला दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह धरला, मात्र चर्चा सुरू होण्यापूर्वीच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी विमानतळाव्यतिरिक्त दुसरे कुठे नाव सुचवायचे असेल तर सुचवा, असे म्हटले, पण आम्ही आताही 'दिबां'च्या नावावर ठाम असल्याचे स्पष्ट केले. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी तुम्ही असा आग्रह धरत असाल तर आमचे शिवसैनिकही रस्त्यावर उतरतील, असे सांगितले.

एकीकडे त्यांनी आपल्या पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ममता बॅनर्जी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी पश्चिम बंगालमध्ये अस्मिता जपण्याचे उचललेले पाऊल अभिनंदनीय असल्याचे म्हटले आणि दुसरीकडे मात्र ते पनवेल, उरण, रायगडसह कोकणची जनता जी अस्मिता जपतेय तिला नाकारतात. दरम्यान, २४ जूनच्या सिडको घेराव आंदोलनाची जोरदार तयारी पूर्णत्वास आली असून, त्या अनुषंगाने घेण्यात येत असलेल्या विभागनिहाय बैठकांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचे दिसून येत आहे. 'आमच्या मनानं घेतलाय ठाव, विमानतळाला दिबांचंच नाव!,' अशी ठाम भूमिका 'दिबा'प्रेमी जनतेने घेतली आहे. किमान एक लाख लोकांचा या आंदोलनात सहभाग असणार आहे. शांततापूर्ण स्वरूपात हे आंदोलन केले जाणार असून त्या दृष्टीने नियोजन व तयारी केली आहे. लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानळाला देण्याच्या मागणीसाठी भूमिपुत्र एकवटले आहेत. 'दिबां'ची अस्मिता जपण्यासाठी सर्व भेद बाजूला करून सज्ज होऊ या, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

**मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर**

# नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव देणंच संयुक्तिक राहील : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणामुळे वातावरण तापलं असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरेंनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. विमानतळ नामकरणावरून नवी मुंबईचे भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी आज मुंबईत 'कृष्णकुंज'वर राज ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकार परिषद घेत राज यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. नवी मुंबई विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव देणंच संयुक्तिक राहील असं राज यांनी सांगितलं.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव देण्याबाबत स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन पुकारलं आहे. तर शिवसेनेनं विमानतळाला बाळासाहेब ठाकरे यांचं नाव देण्याचा निर्धार केला आहे. या पार्श्वभूमीवर राज यांनी त्यांची भूमिका जाहीर केली. 'मुंबईत विमानतळाला असलेली जागा कमी पडू लागली आहे. त्यामुळे नवी मुंबईत विमानतळ उभारलं जात आहे. मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला आणि देशांतर्गत विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचंच नाव देण्यात आलं आहे. त्यामुळे नवी मुंबईतील विमानतळालादेखील शिवरायांचंच नाव दिलं जावं,' असं राज ठाकरे म्हणाले.




'बाळासाहेब ठाकरे आदरणीय आहेतच. दिवंगत दि. बा. पाटील ज्येष्ठ नेते होते. पण नवी मुंबईतील विमानतळ हे मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचाच भाग आहे ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी. मुंबईत जागा नसल्यानं नवी मुंबईत विमानतळ उभारलं जात आहे. त्या विमानतळाचा आंतरराष्ट्रीय कोडदेखील मुंबई विमानतळाप्रमाणेच इजच् असा असणार आहे. त्यामुळे त्या विमानतळाला छत्रपती शिवरायांचं नाव देण्यात यावं,' अशा शब्दांत राज यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

'महाराष्ट्र ही शिवरायांची भूमी आहे. परदे–शातून येणारा माणूस हा शिवरायांच्या भूमिकेत येत असतो. त्यामुळे विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराज हेच नाव संयुक्तिक असेल. आज बाळासाहेब असते, तर त्यांनी स्वत:देखील शिवरायांचंच नाव विमानतळाला देण्याचा सल्ला दिला असता. विमानतळाला शिवरायांचं नाव दिलं जाणार असेल तर कोणाचाही त्याला विरोध नाही. स्थानिकदेखील त्याला विरोध करणार नाहीत, असं प्रशांत ठाकूर यांनी मला सांगितलं आहे,' असं राज म्हणाले.

विमानतळाला बाळासाहेबांचं नाव द्या, अशी मागणी शिवसैनिकांची आहे. त्यांचा दि. बा. पाटील नावाला विरोध आहे, त्याबद्दल काय वाटतं, असा प्रश्न राज यांना विचारण्यात आला. त्यावर छत्रपती शिवरायांचं नाव देण्यात यावं, ही माझी भूमिका आहे. आता बघू कोण विरोध करतं, अशा शब्दांत राज ठाकरे गरजले.

# अलिबाग जवळ अपघातात दोघांचा जागीच मृत्यू



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग–पोयनाड रस्त्यावर तिनविरा येथील गेस्टहाऊसजवळील वळणावर मोटारसायकल जेसीबीला धडकून झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला.

सत्यवान विष्णू राऊत (वय २३, मूळ रा. सिंधुदुर्ग) आणि अंशुमन निराकार मोहंती (वय २३, रा. ओडिसा) अशी मृतांची नावे आहे. हे दोघेही रिलायन्स टाऊनशिपच्या उमंग रेस्टहाऊसमध्ये कामाला होते. आज (२१ जून) दुपारी पावणेचार वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अपघातग्रस्त मोटारसायकल ही अलिबागवरुन पोयनाडच्या दिशेने चालली होती. तर जेसीबी पोयनाडवरुन अलिबागच्या दिशेने येत होता. तिनविरा येथील गेस्टहाऊसजवळील वळणावर मोटारसायकलचालकाचे नियंत्रण सुटले आणि मोटारसायकल जेसीबीला जाऊन धडकली. यामध्ये मोटारसायकलवरील सत्यवान राऊत आणि अंशुमन मोहंती या दोन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोयनाड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक महादेव जाधव हे इतर पोलीस कर्मचार्यांसह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. मृतदेत ताब्यात घेऊन जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेनासाठी पाठविण्यात आले आहेत. अधिक तपास सुरु आहे.

# ९५ हजाराची लाच घेताना वडघर ग्रामसेवकासह कर्मचारी लाचलुचपत खात्याच्या जाळ्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तक्रारदार याच्या घराचे घरपट्टी व अॅसेसमेंट उतारे देण्यासाठी लोकसेवकाने त्यांच्याकडे एक लाखाच्या लाचेची मागणी करून तडजोडी अंती रुपये ९५ हजार आज दुपारी स्वीकारताना त्यांच्यासह दिवाबत्ती व पाणी पुरवठा कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नवी मुंबईने सापळा रचून पनवेल एस.टी.स्टॅण्ड परिसरातून ताब्यात घेतले आहे.

पनवेल जवळील वडघर ग्रामपंचायत येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असणारे लोकसेवक दगडू देवरे (५४ ग्रामविकास अधिकारी, वडघर) यांनी तक्रारदाराकडे एक लाख रुपयाच्या लाचेची मागणी घराची घरपट्टी व अॅसेसमेंट उतारे देण्यासाठी केली होती. या संदर्भात सदर तक्रारदाराने अॅन्टी करप्शन पथक नवी मुंबई यांच्याकडे तक्रार केल्यानंतर आज दुपारी पनवेल एस.टी. स्टॅण्डच्या मागे इच्छापूर्ती गणेश मंदिरासमोरील रस्त्यावर ब्रिजा गाडीमध्ये ते व त्यांच्यासह सदर ठिकाणी दिवाबत्ती व पाणी पुरवठा कर्मचारी प्रकाश डाकी (३०) या दोघांना सदर लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. या कारवाईमुळे पनवेल परिसरात खळबळ उडाली आहे.

# आंबेत सावित्री पूल वाहतुकीसाठी लवकरच खुला होणार : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा आणि मुख्यत्वे दक्षिण कोकणातील मुख्य प्रवेशद्वार समजला जाणारा आंबेत सावित्री पूल हा दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर वाहतुकीसाठी खुला होणार असल्याचे संकेत पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज (दि.२१ जून ) रोजी पुलाच्या केलेल्या पाहणीदरम्यान दिले.

येत्या दि.२६ जून रोजी २०२१ या पुलावरील प्रवासाचा पहिला ट्रायल आणि इतर सर्व गोष्टींचा आढावा घेतला जाणार असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी यावेळी पाहणी दरम्यान सांगितले. त्यामुळे कोकणातील पर्यटनाला चालना देणारा हा आंबेत सावित्री पूल अखेर वाहतुकीसाठी खुला होणार असल्याचे संकेत यावेळी पालकमंत्री कु.तटकरे यांनी दिले.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या की, कोकणातील मुख्यतः मंडणगड, दापोली, खेड या तीन तालुक्यांना जोडणारा आणि पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करणारा हा मार्ग ओळखला जा–तो. त्यामुळे आता सर्व प्रवाशांसह, शैक्षणिक क्षेत्राशी संबंधितांना, इतर व्यावसायिकांच्या दैनंदिन व्यवहाराला चालना मिळणार आहे. येत्या पाच वर्षात नवीन पूलाचे देखील काम हाती घेतले जाईल व उत्कृष्ट काम केले जाईल, असे सांगितले. यावेळी मंडणगड–खेड–दापोली मतदारसंघाचे माजी आमदार संजय कदम, मुजफ्फर मुकादम, नविद भाईजान अंतुले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.बामणे, श्री.राऊत, संरचना कन्स्ट्रक्शन चे श्री.जोशी, साईट इंजिनीयर लखन आदि उपस्थित होते.

## अहो मुख्यमंत्री साहेब हेच काय तुमचे शिवशाही सरकार

# शाळांची फी भरली नाही म्हणून विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात ठेवणारं?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून जनतेच्या अनेक अपेक्षा होत्या व आहेत. कोरोनाच्या अत्यंत दोन वर्षाच्या कठीण काळात त्यांनी नागरिकांचे जीव वाचविण्यासाठी अटोकाट प्रयत्न व त्यासाठी मोठ्या प्रमाणात लॉकडाऊन करून गरीबांना एक वेळ भोजन मिळण्यासाठी शिवभोजन सारखा उपक्रम राबविला. पण त्या गरिब विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे धनदांडग्या शिक्षण संस्था चालकांनी शाळेची फी भरली नाही म्हणून त्यांचे दाखले देण्याचे व शाळेतून नावे कमी करण्याचा जो सपाटा लावला आहे त्या शिक्षण संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करून अशा शिक्षण संस्थांची तात्काळ मान्यता रद्द करण्याचा आपण जर निर्णय घेतलात तरच खरे तुमचे हे शिवशाही सरकार असल्याचे पालकांमधून बोलले जात आहे.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पदभार स्वीकारल्यावर जनतेच्या हिताचे निर्णय घेण्याचा सपाटा लावला. परंतु धनदांडग्यांच्या हा–तात असलेल्या शिक्षण संस्था चालकांनी गरीब विद्यार्थ्यांच्या त्या पालकांचा लॉकडाऊनचा विचार न करता त्यांना शाळेची फी भरली नाही म्हणून त्यांची नावे शाळेतून कमी करून दाखला देण्याचा सपाटा लावला आहे. त्याचबरोबर काही शिक्षण संस्थांनी त्यांना ऑनलाईन शिक्षण देणे बंद केले आहे. त्यामुळे उगवत्या सुर्याप्रमाणे त्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. म्हणून अशा बेजबाबदार व पालकांना वेठीस धरणाऱ्या शिक्षण संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांची मान्यता तात्काळ रद्द करावी, अशा जर राज्यातील १० शिक्षण संस्थांची किमान मान्यता रद्द झाली तर बाकीच्या शिक्षण संस्था धडा शिकून असले अघोरी कृत्य करणार नाहीत. त्याचबरोबर असे कृत्य करणाऱ्या व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या शिक्षण चालकांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी पालक वर्गामधून केली जात आहे आणि जर ती पूर्ण केली तर आपण खरे शिवशाही सरकारी चालविण्यास यशस्वी आहात, असेच म्हणावे लागेल. अन्यथा शिवशाही सरकार हे धनदांडग्यांच्या दावणीला बांधलेले असल्याचा आरोप पालकवर्गामधून होवू शकतो, याची जाण ठेवावी व योग्य तो निर्णय तात्काळ अंमलात आणावा.

# वादळी वेगाचा नायक

भारतीय क्रीडा क्षेत्रातील सुवर्णपान म्हणता येईल, अशा मिल्खासिंग यांच्या निधनाने एका युगाचा अस्त झाला आहे. क्रिकेटवेड्या भारतात अ‍ॅथलेटिक्ससारख्या खेळामध्ये ऑलिंपिक पदकापर्यंत मजल मारणारे मिल्खासिंग यांचे कर्तृत्व अलौकिक असेच होते. भारतीय क्रीडा क्षेत्राने त्यांच्या या कर्तृत्वाचा योग्य तो सन्मान राखला ही समाधानाची बाब. अतिशय गरीब कुटुंबात जन्माला आल्यानंतर फाळणीचे चटके भोगलेल्या मिल्खासिंगांचे धावपटू होणे हा एक अपघातच होता. दररोज शाळेसाठी जाताना नदीकिनाऱ्यावर असलेल्या तापत्या रेतीत तळपायाला चटके बसू नयेत म्हणून धाव घेणारा मिल्खासिंग हा भारतातील सर्वोत्तम धावपटू म्हणून गौरविला जाईल, याची कल्पनाही कोणी केली नसेल. रोजच्या दोन वेळच्या जेवणाची सोय व्हावी, या मर्यादित हेतूने सैन्यदलात भरती झालेल्या मिल्खासिंग यांनी या सैन्यदलानेच क्रीडा क्षेत्रातील कर्तृत्वाचे एक नवे दालन उघडून दिले. कष्टामध्ये कधीच कमी न पडणाऱ्या मिल्खासिंग यांनी या दालनामध्ये एक सोनेरी पान रचले. मिल्खासिंग यांनी तीन ऑलिंपिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. एखाद्या धावपटूने सलग तीन ऑलिंपिकमध्ये प्रतिनिधित्व करण्याच्या घटना भारतामध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या आहेत. अ‍ॅथलेटिक्समध्ये तर मिल्खासिंग यांच्यानंतर पी. टी. उषा हे एकच नाव घेता येईल. त्याचप्रमाणे चारशे मीटर धावण्याच्या स्पर्धेत राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळविलेले ते एकमेव धावपटू ठरले. सन १९५६मधील मेलबर्न ऑलिंपिक स्पर्धेतील सहभाग ही मिल्खासिंग यांच्या आयुष्यातील पहिली मोठी झेप होती. त्या स्पर्धेमध्ये चारशे मीटरसह दोन सुवर्णपदके मिळविणाऱ्या चार्ल्स जेनकिन्सशी झालेली भेट हा आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट होता, असे त्यांनीच जाहीरपणे मान्य केले. जेनकिन्सने सरावाबाबत दिलेल्या टिप्स, स्पर्धेची मानसिक तयारी कशी करायची याबाबत केलेले मार्गदर्शन खेळाडू म्हणून आपल्याला आयुष्यभर उपयोगी पडले, असेही त्यांनी नोंदवून ठेवले आहे. मुळात चारशे मीटर धावण्यामध्ये प्रावीण्य असलेल्या मिल्खासिंग यांनी सेनादलातील आपल्या युनिटला अधिक गुण मिळावेत, यासाठी शंभर मीटर व दोनशे मीटर धावण्याच्या शर्यतीतही भाग घेण्यास प्रारंभ केला. या दोन्ही शर्यतींचा प्रारंभ वेगाने करण्याला खूप महत्त्व असते. दुर्दैवाने मिल्खासिंग यांना त्यावर कारकिर्दीमध्ये कधीच प्रभुत्व मिळविता आले नाही. पण आपला वेग इच्छेनुसार कधीही वाढवू शकण्याच्या कौशल्याने त्यांनी आपल्या त्या त्रुटीवरही मात करून त्या दोन्ही शर्यंतीमध्येही राष्ट्रीय स्पर्धांमध्ये नेत्रदीपक यश मिळविले. प्रारंभ वेगाने न करण्याबरोबरच रिले शर्यतीमध्ये बॅटन बदलण्याच्या कौशल्यामधील त्रुटीही त्यांनी आपल्या वेगाच्या जोरावरच भरून काढल्या. रोमच्या ऑलिंपिक स्पर्धेतील चारशे मीटरची शर्यत हा मिल्खासिंग यांच्या कारकिर्दीतील उत्कर्षबिंदू होता. त्या स्पर्धेत प्राथमिक फेरीत त्यांनी माजी विजेत्याला मागे टाकले होते. साहजिकच त्यांचे नाव पदक विजेत्यांमध्ये असेल, असे गृहीत धरण्यात येत होते. शर्यतीत अडीचशे मीटरच्या टप्प्यावर सिंग यांनी आघाडी घेतली. पण ती आघाडी टिकविताना त्यांची दमछाक झाली व अखेरच्या टप्प्यामध्ये ते चौथ्या क्रमांकावर फेकले गेले. त्या शर्यतीत या चारही धावपटूंनी विश्वविक्रमापेक्षा सरस कामगिरी केली होती; पण 'फोटो फिनिश'मध्ये मात्र मिल्खासिंग यांना पराभव पत्करावा लागला. ही गोष्ट मिल्खासिंग यांच्या मनाला शेवटपर्यंत बोचत राहिली. अर्थात मिल्खासिंग यांनी त्या शर्यतीत नोंदविलेला राष्ट्रीय विक्रम पुढे ४० वर्षे अबाधित राहिला. त्यानंतर आशियाई स्पर्धेमध्ये त्यांनी पुन्हा दोन सुवर्णपदके मिळविली; पण ऑलिंपिकमध्ये मात्र रिले शर्यतीत भारतीय संघाला प्राथमिक फेरीतच बाद व्हावे लागले. दरम्यानच्या काळा पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या आग्रहावरून मिल्खासिंग यांनी पाकिस्तानमध्ये जाऊन तेथील राष्ट्रीय विजेता अब्दुल खालिकला पराभूत केले होते. त्यांना त्या सुवर्णपदकाबरोबच 'फ्लाइंग सिख'ची पदवी दिली गेली. नंतरच्या काळात तीच त्यांची ओळख बनली. खेळातून निवृत्त झाल्यानंतर सिंग यांनी पंजाबचे क्रीडा संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली व पुढे २५ वर्षे ती सांभाळली. आपल्या स्पष्टवक्तेपणा आणि फटकळ स्वभावामुळे मिल्खासिंग यांनी आपल्या नंतरच्या आयुष्यातील क्रीडा क्षेत्रातील प्रशासकांवर शाब्दिक कोरडे ओढले. त्यामुळेच कदाचित त्यांना सरकारने दिलेल्या 'पद्मश्री'शिवाय इतर कोणतेही मानसन्मान मिळाले नाहीत. त्याबद्दल त्यांनी कधी खंतही व्यक्त केली नाही. व्यक्तिगत आयुष्यातही अतिशय पारदर्शीपणा जपणारे मिल्खासिंग म्हणूनच अनेक खेळाडूंचे रोल मॉडेल बनले. भारतामध्ये क्रीडासंस्कृती रुजविण्यातील त्यांचा सहभाग यापुढेही कायम लक्षात राहील. तीच त्यांना श्रद्धांजली असेल.

# नेरळ ग्रामपंचायतील सरपंच निधनामुळे राजकीय समीकरण उलथापालथ होण्याची शक्यता




**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ ग्रामपंचायत या आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीमध्ये नजीकच्या काळात राजकीय समीकरणे बदलणार अशी चिन्हे आहेत. थेट सरपंच म्हणून निवडून आलेले रावजी गोमा शिंगवा यांचे आकस्मिक निधन झाल्याने आता नेरळ ग्रामपंचायतीचे सरपंचपद हे सदस्यांतून निवडले जाणार आहे. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतीमधील शिव–सेनेची सत्ता राजकीय समीकरणे पाहता सेनेच्या हातातून जाण्याची शक्यता आहे.

ऑगस्ट २०१९ मध्ये नेरळ ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक झाली होती आणि त्यावेळी थेट सरपंच म्हणून शिवसेना–भाजप युतीकडून रावजी शिंगवा हे विजयी झाले होते.

अनुसूचित जमाती साठी राखीव असलेल्या सरपंचपदावर थेट जनतेतून शिंगवा तर सेना–भाजप युतीने १२ जागा जिंकत बाजी मारली होती. तर राष्ट्रवादी कॉँग्रेसचे तीन, शेतकरी कामगार पक्षाचे एक तर शेकाप बंडखोर एक असे विरोधी गटाचे पाचजण विजयी झाले होते.

मात्र उपसरपंचपदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला उपसरपंचपद देण्यात आले नसल्याने भाजपने ऐनवेळी सेनेची साथ सोडून विरोधी गटासोबत हातमिळवणी केली. त्यामुळे शेकापचे बंडखोर म्हणून निवडून आलेले शंकर घोडविंदे हे उपसरपंच बनले. तेव्हा–पासून दरवेळी बिग बजेटच्या नेरळ ग्रामपंचायतीमध्ये राजकीय घडामोडी घडत असतात.

प्रथम राष्ट्रवादीच्या पॅनलमधून निवडून आलेल्या पार्वती पवार यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. तर सेनेने उपसरपंचपदावर निवडणूक लढविण्याची संधी दिलेल्या धर्मानंद गायकवाड यांना सेनेच्या नेरळ ग्रामपंचायतीमधील सत्तेत कोणत्याही निर्णयात सहभागी करुन घेत नसल्याने त्यांनी शिवसेनेला रामराम ठोकला आणि आरपीआय आठवले गटात प्रवेश करुन पक्षाचे जिल्हा संपर्कप्रमुख हे पद मिळवले.

# गरजेपोटी बांधलेल्या घरांचा निर्णय झाला ? अधिकृत घोषणा लवकरच

## महाविकास आघाडीच्या नेत्यांनी या योजनेला स्व. दि.बा.पाटील योजना नाव देण्याची केली मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रकल्पग्रस्तांची वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत तसेच इतर महत्वाच्या मागण्यांबाबत आज महत्वाची चर्चा व त्यावरील निर्णय झाला आहे. मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे याबाबत रीतसर प्रसिध्द करतीलच, पण सिडकोबाधित प्रकल्पग्रस्तांची नैसर्गिदृष्ट्या बांधलेली गरजेपोटीची घरे आता कायम होणार आहेत, त्यामुळे नैसर्गिक गरजेपोटी योजना राज्य सरकारच्यावतीने अंमलात येणार असून या योजनेच्या कामाला सुरुवात देखील झाली आहे, या योजनेला स्व. दि.बा.पाटील नैसर्गिक गरजेपोटी योजना असे नाव देण्यात यावे, अशी मागणी पनवेल उरण महाविकास आघाडीच्या स्व. दि.बा.पाटील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांच्यासह शिष्टमंडळाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. आज सोमवारी पार पडलेल्या बैठकीनंतर येत्या काही दिवसात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गरजेपोटी घरे कायम करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करणार आहेत.

गेल्या ५० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महत्वाच्या प्रश्नासह सिडकोच्या विरोधातील जनतेचा रोष पाहता पनवेल उरण महाविकास आघाडीच्या नेत्यांनी गेल्या दीड वर्षांपासून सुरू केलेल्या पाठपुराव्याला आज यश मिळाले आहे. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांना दिलेले वचन आजच्या बैठकीमध्ये सफल सफल झाल्याचे चित्र आहे.

आज झालेल्या बैठकीसाठी स्व. दि. बा. पाटिल स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून समितीचे अध्यक्ष बबनदादा पाटिल ह्यांच्या नेतृत्वाखाली आमदार बाळाराम पाटिल, मा. आमदार व जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर, कॉँग्रेस जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत, राष्ट्रवादी प्रदेश चिटणीस प्रशांत पाटिल, कॉँग्रेस जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटिल, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरिष घरत, शेकापचे पनवेल महानगरपालिका चिटणीस गणेश कडू आदी नेत्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ह्यांची वर्षा ह्या निवासस्थानी भेट घेतली आहे. तसेच राज्य सरकारच्यावतीने मुख्यमंत्री लवकरच याबाबत निर्णय जाहीर करण्याची शक्यता या नेत्यांनी वर्तविली आहे.

# मतदार यादीतील छायाचित्र नसलेल्या मतदारांनी निवडणूक शाखेत फोटो जमा करावेत : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । उरण**

निवडणूक आयोगाकडून मतदारांचे फोटोसहीत मतदार यादी अद्यावत करणे बाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. १९० – उरण विधानसभा मतदार संघात उरण तालुक्यातील १४१ मतदान केंद्रांमध्ये ५ १५१ मतदारांचे फोटो मतदार यादीमध्ये नाहीत. फोटो नसलेल्या मतदारांनी त्यांचे फोटो केंद्रस्तरीय अधिकारी(इडज ) उरण यांच्याकडे तात्काळ जमा करावेत किंवा तहसिल कार्यालय उरण येथे निवडणूक शाखेत जमा करावेत.

त्याच प्रमाणे अनेक मतदार स्थलांतरीत असल्याचे केंद्रस्तरीय अधिकारी उरण यांचे निदर्शनास आले आहे. सदर स्थलांतरीत मतदारांचे पंचनामे केंद्र स्तरीय अधिकारी त करण्यात आलेले आहेत. सदर मतदारांची यादी राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांना देण्यात आली आहे. तरी मतदार यादीमध्ये फोटो नसलेल्या मतदारांनी त्यांचे फोटो केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे अथवा तहसिल कार्यालय उरण येथे ३० जुन २०२१ पर्यंत जमा करावेत अशी सूचना उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी तालुक्यातील मतदारांना केली आहे.

सदर मतदार स्थलांतरीत आहेत. असे गृहीत धरून त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येणार असल्याचे नमूद करून मतदान नोंदणी अधिकारी १ ९० – उरण विधान सभा मतदार संघ श्रीमती अश्विनी पाटील, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी १९० – उरण विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, निवडणूक नायब तहसिलदार उरण आशा म्हात्रे, यांनी केले आहे. या अनुषंगाने उरण तहसील कार्यालयात उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांच्यासह उरणचे निवासी नायब तहसिलदार संदीप खोमणे, उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सायली म्हात्रे, नगरसेवक धनंजय कडवे, नगरसेवक नंदु लांबे, नगरसेविका यास्मिन गॅस, उरण तालुका कॉँग्रेस अध्यक्ष जे.डी.जोशी आदी उपस्थित होते.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# रायगड डाक विभागामार्फत नाविन्यपूर्ण उपक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सातव्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून भारतीय डाक विभागामार्फत योगसंबधीत विशेष कॅन्सलेशनचे अनावरण केले गेले. त्या निमिताने देशभरातील ८१० मुख्य टपाल कार्यालयांमध्ये दि.२१ जून रोजी नोंदणी झालेल्या सर्व टपाल तिकिटांवर योगसंबधीत विशेष कॅन्सलेशन बी विथ योगा बी अ होम हा संदेश हिंदी व इंग्रजी भाषेतून शाईने उमटविण्यात आला आहे.


दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that, 1) Nilofar Shafic Shaikh 2) Mr.Wasim Mubarak Bagwan have agreed to Purchase the property as described in the Schedule mentioned hereunder, from its present owner 1) Mr.Pagoti Tataih (Dead), 2) Mr.Pagoti Anil Varma, 3) Mrs.Pagoti Ratna

If any person or persons, Company, Bank, Financial Institution or anybody else having any right, title, interest, claim, against or to the said property mentioned in the Schedule, dispute over the property mentioned in the Schedule or any part thereof by way of Sale, Transfer, Exchange, Mortgage, Charge, Gift, Trust, Lease, License, Tenancy, Easement, Use, Possession, Inheritance, Bequeath, Lien, Attachment or otherwise howsoever is hereby required to communicate/intimate the same to the undersigned at his office address given herein below with documental proof sufficient to their claims within a period of 7 days from the date of publication hereof, failing which it shall be deemed that the said property is without any encumbrances of any nature whatsoever, shall proceed with the purchase of the said property in the nature and manner that they deem fit and proper. Any claims, objections, demands received after the said period shall not be considered. and any claims, if any will be considered as waived.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**Flat No.201, Second Floor, Building No.-S-1, (S-1 S-2 S-3) Type CHS. Ltd. Moraj Riverside Park, Takka Panvel**

**Sd/-**
**Mrs.Nilofar Shafic Shaikh**
**Mr.Wasim Mubrak Bagwan**
**MACHS LTD. Flat No.201,**
**Moraj Riverside Park, Near Nanesh Hostel, Takka, Panvel, Dist-Raigad**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.पागोटी ततयाह (मयत), २) श्री.पागोटी अनिल वर्मा, ३) श्रीमती.पागोटी रत्ना यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत १) सौ.निलोफर शफिक शेख, २) श्री.वसीम मुबारक बागवान विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**फ्लॅट नं.२०१, दुसरा माळा, बिल्डींग नं.एस–१ (एस १ एस २ एस ३) टाईप, सी.एच.एस.लि., मोराज रिव्हरसाईड पार्क, तक्का, पनवेल**

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्कहितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत आपल्या हक्कहितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे/खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.२१/०६/२०२१

**सही/–**
**सौ.निलोफर शफिक शेख**
**श्री.वसीम मुबारक बागवान**
**एम.ए.सी.एच.एस.लि., फ्लॅट नं.२०१, मोराज रिव्हरसाईड पार्क, नानेश हॉस्टेल जवळ, तक्का, पनवेल, जि.रायगड**


**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९


## ग्रामपंचायत देवळोली

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.२१/०६/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत देवळोली हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामपंचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.२२/०६/२०२१ ते २८/०६/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२९/०६/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत देवळोली यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत देवळोली येथे स्मशानभूमी बांधणे | जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजना सन २०२०/२१ | ४००००० /– | ४००० /– | ६ महिने | सर्वसाधारण |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत देवळोली**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत देवळोली**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेलजवळ टेंपोच्या अपघातात एक ठार, सहा जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पिकअप टेंपोवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेंपोसमोरील कंटेनरवर जाऊन धडकल्याने झालेल्या अपघातात एक महिला ठार तर टेंपोचालकासह सहा जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील खिडूकपाडा येथे घडली आहे.

शहापूर येथील साठगाव या ठिकाणी राहणारे विषे कुटूंबिय महाड येथून आपल्या घरी जात असताना तालुक्यातील खिडूकपाडा येथे टेंपोचालक अशोक विषे यांचा त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटल्याने टेंपोसमोरील कंटेनरवर जाऊन धडकल्याने झालेल्या अपघातात टेंपोतील कल्पना विषे (वय-६२) या गंभीररित्या जखमी होऊन मृत पावल्या आहेत. तर अशोक विषे (वय-५२), गुरूनाथ विषे (वय-४२), संगीता विषे (वय-४९), वनिता उर्फ बेबी विषे विषे (वय-६२), कविता विषे (वय-६२) आणि रेश्मा विषे (वय-५१) या सहा जणांचा समावेश आहे.

## सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पाच हजार रूपये किंमतीच्या सायकलची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे.

मुकेशकुमार कन्हैय्या सिंह यांची पाच हजार रूपये किंमतीची केशरी व काळ्या रंगाची झिपर कंपनीची सायकल तळोजा फेज-१ नवरंग रेसिडेंसी येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सायकलचे लॉक तोडून सदर सायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जिल्ह्यात दिवसभरात सरासरी ३५ मि.मी. पावसाची नोंद

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी ३५.१५ मि.मी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. तसेच दि.१ जून पासून आज अखेर एकूण सरासरी ८१८.२८ मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली आहे.


आज सकाळी प्राप्त दैनंदिन पर्जन्यमान अहवालानुसार तालुकानिहाय पावसाची नोंद पुढीलप्रमाणे- अलिबाग- १०.०० मि.मी., पेण- २३.०० मि.मी., मुरुड- ६३.०० मि.मी., पनवेल- २३.६० मि.मी., उरण-६७.०० मि.मी., कर्जत- १३.८० मि.मी., खालापूर- १२.०० मि.मी., माणगाव- ३८.०० मि.मी., रोहा- ३०.०० मि.मी., सुधागड-३०.०० मि.मी., तळा- ६३.०० मि.मी., महाड- २४.०० मि.मी., पोलादपूर- २६.०० मि.मी, म्हसळा- ४७.०० मि.मी., श्रीवर्धन- ६६.०० मि.मी., माथेरान- २६.०० मि.मी.असे आजचे एकूण पर्जन्यमान ५६२.४० मि.मी. इतके आहे. त्याची सरासरी ३५.१५मि.मी. इतकी आहे. एकूण सरासरी पर्जन्यमानाची टक्केवारी २६.०४ टक्के इतकी आहे.

# कर्जत तालुक्यात सतत ४ वर्षे पर्यटनावर बंदी स्थानिकांमध्ये नाराजीचे सुर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

निसर्ग सानिध्यात असलेला प्रदूषणमुक्त तालुका म्हणून बिरुदावली मिरवणाऱ्या कर्जत तालुक्यात यावर्षीही शासनाच्या जमावबंदी आदेशामुळे पर्यटन व्यवसाय धोक्यात आले आहे. त्यामुळे स्थानिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

पावसाळ्यात वाहणारे धबधबे व प्राचीन लेण्यांमुळे कर्जतचे सौंदर्य पाहण्यासाठी मुंबई, पुणे, कल्याण, ठाणे आदी भागा-तून पर्यटक येत असतात. परंतु मागील दोन वर्षे पर्यटकांच्या अतिउत्साहामुळे आणि आता लॉकडाऊनमुळे कर्जतच्या पर्यटनावर जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहे. परिणामी पर्यटन व्यवसाय धोक्यात आला आहे. छोट्या मोठ्या दुकानदारांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे कर्जतमध्ये सर्व गोष्टींचा विचार करून शासनाने यावर उपाययोजना करुन जमावबंदी




आदेश उठवावा आणि पर्यटनाला चालना द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सागर शेळके यांनी केली आहे. कर्जत तालुक्यात औद्योगिकरण नसल्याने रोजगाराची खूप मोठी समस्या आहे. पण कर्जत तालुक्याला निसर्गसौंदर्य लाभलेले आहे.त्या सौंदर्यामध्ये माथेरान हे थंड हवेचे ठिकाण व कर्जतमधील लेण्या, धबधब्यांवर प्रशासनाने १४४ कलम लावून सलग ४ वर्षांपासून बंद केले आहेत. मागील वर्षांपासून कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता प्रशासनाचा योग्य निर्णय योग्य होता. पण त्याअगोदरची २ वर्षेही यावर उपाययोजना न करता जमावबंदी आदेश लावण्यात आला होता. पावसाळ्यात ट्रेकींग व वर्षासहलींसाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात कर्जतमध्ये येतात. कर्जत तालुक्यात आशाणे, बेकरे, वदप, नेरळ जुमापट्टी, सोलनपाड़ा, कोंढाणा लेणी, माथेरान असे अनेक धबधबे आणि लेणी पर्यटनस्थळे आहेत.

## आरोग्य क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना मोफत प्रशिक्षण : जिल्हाधिकारी निधी चौधरी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आरोग्य क्षेत्रात काम करण्यास इच्छुक असलेल्या राज्यातील १८ ते ४५ वयोगटातील युवक/ युवतींना हेल्थ केअर, मेडिकल व नर्सिंग क्षेत्रामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान अंतर्गत मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.



हा प्रशिक्षण कार्यक्रम जप गेल Training या तत्वावर राबविण्यात येणार आहे. यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांनी निवड केलेल्या अभ्यासक्रमानुसार त्यांना MSCVT/SSC यांच्यामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या योजनेचा जिल्हयातील जास्तीत जास्त लाभ इच्छुक उमेदवारांनी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSdtZpvLGa31Rp7Yev-7šiSIgYX0zgv3E98us8jYcSx 9YawF8-/viewform?usp=sfšlink या गुगल फॉर्म लिंकवर आपली माहिती भरुन घ्यावा, तसेच ही माहिती जास्तीत जास्त गरजू उमेदवारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त श्री. शा.गि. पवार यांनी केले आहे.

## ग्रामस्थांच्या विरोधानंतरही मोबाईल कंपन्यांचे टॉवर उभारणीचे काम सुरूच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन येथील र. ना. राऊत विद्यालयासमोर एका मोबाइल कंपनीने टॉवर उभारण्यासाठी खोदकाम करून काँक्रीटचा चौथरा उभा केला होता. सदर टॉवरचे काम सुरू झाल्यानंतर स्थानिक नागरिकांनी या टॉवरला विरोध केला होता. तसेच शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी देखील टॉवरला विरोध दर्शविला होता. तशा आशयाचे पत्र श्रीवर्धन नगर परिषदेकडे देण्यात आले होते. मात्र श्रीवर्धन नगर परिषद प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई टॉवर कंपनीवर करण्यात न आल्याने मोबाईल कंपनीने टॉवर उभारण्याचे काम जलद गतीने सुरू केले आहे. श्रीवर्धन येथील र.ना. राऊत विद्यालयात इयत्ता पाचवी पासून इयत्ता बारावी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत असतात. पाचवी ते सातवी या वर्गामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी वयाने खूप लहान असतात. मोबाईल टॉवरमधून होणाऱ्या रेडिएशनचा त्रास लहान विद्यार्थ्यांना होऊ शकतो.

या त्रासाने विद्यार्थ्यांच्या मेंदू वरती परिणाम होऊ शकतात किंवा मेंदूचे आजार उद्भवू शकतात. असे असतानादेखील श्रीवर्धन नगर परिषद प्रशासनाने कोणत्याही गोष्टीचा विचार न करता टॉवर उभारणार्या कंपनीला ना हरकत प्रमाणपत्र दिल्याने सदर टॉवर कंपनीने आपले काम जोमाने सुरू केल्याचे पाहायला मिळत आहे. ज्या ठिकाणी टॉवर उभा केला जात आहे त्याच्या आजूबाजूला नागरी वस्ती देखील मोठ्या प्रमाणात आहे. त्या ठिकाणच्या नागरिकांनी देखील मोबाईल टॉवर होऊ नये म्हणून श्रीवर्धन नगर परिषदेकडे अर्ज केला होता. परंतु नगरपरिषदेने टॉवरचे बांधकाम होऊ नये यासाठी कोणतीही कारवाई न केल्याने अखेर स्थानिक नागरिक सदर टॉवरचे काम थांबवण्यासाठी कोर्टात जाणार असल्याचे विश्वनसनीय माहिती प्राप्त झाली आहे.

## अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त आभासी परिषद व प्रश्नमंजुषेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

आज २१ जून म्हणजेच आंतरराष्ट्रीय योग दिन. योग ही एक प्राचीन भारतीय प्रथा आहे जी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यास मदत करते आणि वर्षानुवर्षे इतर देशांमध्येही याला लोकप्रियता मिळाली आहे. गेल्या दीड वर्षात, कोरोनाव्हायरस साथीच्या आजारामुळे योगास अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे आणि त्यानुसार आंतरराष्ट्रीय योग दिन २०२१ हा योगा फॉर वेल बेईन्ग या थीम नुसार साजरा करण्याचा संयुक्त राष्ट्र संघाने निर्णय घेतला आहे.

मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान महाविद्यालयातर्फे यो-गावर आधारित प्रश्नमंजुषा तसेच गूगल प्लॅटफॉर्म वर आंतरराष्ट्रीय आभासी योग परिषदेचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय आभासी योग परिषदेमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी अहमदनगर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभातील प्राध्यापिका व योग ट्रेनर डॉ. निशा गोडसे यांना प्रचारण करण्यात आले होते. त्यांनी योगाचे महत्व विशद करून सोप्या कृतीचे प्रात्यक्षिक गूगल प्लॅटफॉर्म वर दाखविण्यात आले. या दिनानिमित्त कार्यक्रमाच्यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी योग दिन ची माहिती सर्व उपस्थिताना सांगितली. तसेच विद्यार्थ्यांसाठी योगा कसे महत्वाचे आहे याची माहिती करून दिली.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यलयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. शोहेब खान, डॉ स्वाती खराडे, प्रा. नितीन पवार व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये जुहेब मोदी, सुलतान मसालेवाले, नवाब शेख, नईम शेख, शराफत शेख, शेजल धुमाळ व सचिन उपाध्ये यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांमध्ये तंझील उलडे, उमर कबले, तस्कीन महाडकर, स्वालेह मुकादम, मुस्कान दरोगे, सुमय्या सती यांनी विशेष प्रयत्न केले.

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १७ वर्षीय ६ महिने झालेल्या मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

तालुक्यातील बारापाडा येथे राहणारी एक मुलगी उंची ५ फूट, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा पातळ असून अंगात जांभळ्या रंगाचा स्कार्फ, चॉकलेटी रंगाचा गाऊन, गळ्यात साधी चेन, तिला मराठी, हिंदी व उर्दू भाषा अवगत आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलिस ठाणे किंवा पोलिस उपनिरीक्षक आकाश पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## फादर्स डे निमित्त १५० रोपांची लागवड ; मुठवली खु.येथील युवकांचा स्तुत्य उपक्रम

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील मुठवली खु.येथील युवकांनी फादर्स डे चे औचित्य साधून गावातील परिसरात एकूण विविध जातीच्या झाडांचे १५० रोपांची लागवड करून फादर्स डे एका वेगळ्या उपक्रमाने साजरा केला. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

यावेळी मालसई ग्रा.पं.उपसरपंच योगेश शिंदे, मंगेश शेळके, लीलाधर नाक्ती, धनराज शिंदे, मयुरेश तुपकर, रोशन शिंदे, गौतम सावंत, किरण तुपकर, विनायक सावंत, चेतन शिंदे, शिवतेज शिंदे आदी युवकांनी एकत्र येऊन सदरचा उपक्रम यशस्वीपणे पार पाडला.

वृक्ष हे आपल्या माता-पित्याप्रमाणे आहेत. कोणतीही अपेक्षा न करता अनादी काळापासून वृक्ष आपल्याला नेहमीच बऱ्याच गोष्टी देत आले आहेत.

आपल्या जीवनात ते आपल्या पालकत्वाचीच भूमिका बजावित आहेत. तर येथील युवकांनी १५० रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनासाठी एक पाऊल पुढे टाकित एकप्रकारे खारीचाच वाटा उचलला असून लावलेल्या रोपांचे मोठ्या वृक्षात रुंपातर करण्याचा निश्चय केला असल्याचे व त्यांचे मोठे होईपर्यंत व्यवस्थित संगोपण व संरक्षण केले जाईल तसेच भविष्यात अशाचप्रकारे वृक्ष लागलडीचा आमचा कार्यक्रम चालू राहिल अशाप्रकारची प्रतिक्रिया उपसरपंच योगेश शिंदे यांनी या उपक्रमाची माहिती देताना पत्रकारांना सांगितले.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही श्रीमती.शोभा सुरेश भगत यांच्या मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत आहे. सदरहू मिळकत ही श्रीमती.शोभा सुरेश भगत यांचेकडून आमचे अशिल श्री.जिया अब्दुल सत्तार नम्रे, रा.तळोजा गाव, ता.पनवेल, जि.रायगड यांनी जमीन मालकाकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बीड, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र./उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|
| ५२ | ०-१८-७० | २.१२ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकवीस (२१) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार अडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.२१/०६/२०२१

**सही/-**
**अॅड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा-पाचनंद, न्यू भारत**
**राईस मिल जवळ, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**

मा.गोडसे सो.

वकील मनोज वारंगे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५१७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०७/२०२१

१) सुरेखा सुभाष शिंदे
२) देवेंद्रा सुभाष शिंदे
दोघे रा.फ्लॅट नं.१०३, शिवालया, प्रितीराज सी.एच.एस.,
प्लॉट नं.१०, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई
३) सीमा रुपेश कर्पे लग्नाआधीचे नाव
सीमा सुभाष शिंदे
रा.१०२, सुर्यदर्शन रेसिडेन्सी, फ्लॅट नं.४२/४३,
ऐश्वर्या हॉटेल जवळ, सेक्टर २०, कळंबोली,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२, ३ यांचे वडील मयत कै. श्री.सुभाष सहदेव शिंदे राहणार फ्लॅट नं.१०३, शिवालया, प्रितीराज सी.एच. एस., प्लॉट नं.१०, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई यांचे दि.२३/०९/२०१७ रोजी एम.जी.एम.न्यू बॉम्बे हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले आणि सदर मयताचे नावे असलेली स्थावर मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.१०३, १ ला मजला, शिवालया,**
**प्रितीराज को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी,**
**प्लॉट नं.१०, सेक्टर ११, खारघर, नवी मुंबई**
**किंमत रुपये ८,२०,०८०/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून वारसदाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/०/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब

अॅड.राजकुमार जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५८४/२०२१
नि.नं.८
ने.ता.२७/०८/२०२१

कै.इंदुबाई नारायण कोळी मयतचे वारस
श्री.नवनाथ नारायण कोळी
वय : वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.१२२६, चांगा पदा मार्ग, कोळीवाडा,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. इंदुबाई नारायण कोळी ह्यांचे निधन दि.२५/०६/२०२० रोजी रा.१२२६, चांगा पदा भोईर मार्ग, कोळीवाडा, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाले असून तसेच कै.इंदुबाई नारायण कोळी यांचे पती कै. नारायण रामा कोळी यांचे निधन राहत्या घरी झाले आहे. अर्जदार श्री.नवनाथ नारायण कोळी यांनी कै.इंदूबाई नारायण कोळी यांच्या मालकीची खालील वर्णनाची संपादीत मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| करंजाडे | १०२ ब व १०२ ब/१ | १०७/३ |
| | | १०७/४ |
| | | १२०/२ |
| | | १२२/३ |
| | | ११०/ई |
| | | ११६/२ |
| | | १०८/६ |
| | | १०९/८ |
| | | ११०/अ/१ब |
| | | ११०/अ/३ |
| | | १११/अ/१ |
| | | १०२/अ/५ |
| | | १०४/अ/४ |
| | | १०४/अ/५ |
| | | १०४/ब/२ |
| | | ११६/१ |
| | | १०६/४ |
| | १०२ ब १/२ | १०६/४ |
| | १०२ ब/२ | ११०/अ/१ अ |
| | १२० ब व १०२ ब | ११५ ब/० |
| | १०२ क | १०२/ब/१ |
| | १०२ ड | १०४/अ/२ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.इंदुबाई नारायण कोळी यांना मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.नवनाथ नारायण कोळी हे कै. इंदुबाई नारायण कोळी यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.नवनाथ नारायण कोळी यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.इंदुबाई नारायण कोळी यांच्या पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

मा.बहिर साहेब

अॅड.राजकुमार जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५९९/२०२१
नि.नं.८
ने.ता.१८/०८/२०२१

कै.रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील मयतचे वारस
१) सौ.दिपाली कैलास भोईर पुर्वाश्रमीचे नाव
दिपाली रघुनाथ पाटील
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.१२३०, फिश मार्केट जवळ,
कोळीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.अर्चना सुरेश शेलार पुर्वाश्रमीचे नाव
अर्चना रघुनाथ पाटील
वय : ३१ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.१०६१-२, खाडीची बाजू, कोळीवाडा,
चांगा पदा भोईर मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) कु.प्रेरणा रघुनाथ पाटील
वय : २१ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.१०७०, कोळीवाडा, चांगा पदा भोईर मार्ग,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील ह्यांचे निधन दि.१८/०३/२०१७ रोजी कोळीवाडा, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे झाले असून सौ. दिपाली कैलास भोईर पुर्वाश्रमीचे नाव दिपाली रघुनाथ पाटील वगैरे ह्यांनी कै. रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| करंजाडे | १०२ ब व १०२ ब/१ | १०७/३ |
| | | १०७/४ |
| | | १२०/२ |
| | | १२२/३ |
| | | ११०/ई |
| | | ११६/२ |
| | | १०८/६ |
| | | १०९/८ |
| | | ११०/अ/१ब |
| | | ११०/अ/३ |
| | | १११/अ/१ |
| | | १०२/अ/५ |
| | | १०४/अ/४ |
| | | १०४/अ/५ |
| | | १०४/ब/२ |
| | | ११६/१ |
| | | १०६/४ |
| | १०२ ब १/२ | १०६/४ |
| | १०२ ब/२ | ११०/अ/१ अ |
| | १२० ब व १०२ ब | ११५ ब/० |
| | १०२ क | १०२/ब/१ |
| | १०२ ड | १०४/अ/२ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील यांना मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे भूखंड वितरित करण्यात येणार आहे. सौ.दिपाली कैलास भोईर पुर्वाश्रमीचे नाव दिपाली रघुनाथ पाटील वगैरे हे कै.रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट सौ.दिपाली कैलास भोईर पुर्वाश्रमीचे नाव दिपाली रघुनाथ पाटील वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.रुक्मिणीबाई रघुनाथ पाटील यांच्या पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२१/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## ग्राम संवर्धनमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारत सरकारच्या नेहरू युवा केंद्र (रायगड) आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने बांधनवाडी येथे सोमवारी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

नेहरू युवा केंद्राचे रायगड जिल्हा समन्वयक निशांत रौतेला यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियम पाळून ग्राम संवर्धन संस्थेचे कार्यालय बांधनवाडी येथे योग दिन साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या कार्यक्रमात प्रकल्प समन्वयक उदय गावंड यांनी उपस्थितांना योगाचे महत्व सांगून प्रात्यक्षिक करून घेतली. यावेळी तेजस चव्हाण, सुनील विश्वकर्मा, गोलू गुप्ता, रमेश महर, साहिल साहू यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

## घरफोडीत दागिने लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घऱातील मुख्य दरवाजा बंद असल्याचे पाहून त्याचा कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना बेलपाडा परिसरात घडली आहे.

एकनाथ अमृतसागर (वय-४५, रा.-त्रिमूर्ती सदन, बेलपाडा) यांचे घराचा मुख्य दरवाजा बंद असल्याचे पाहून त्याचा कडीकोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून घरात असलेले मंगळसूत्रांसह इतर दागिने असा मिळून ३८ हजार ५०० रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची तक्रार खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सुधागड तालुक्यात सोमवारी १२ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात सोमवारी (ता.२१) १२ जण कोरोना बाधित रुग्ण सापडले. तर ११ जणांनी कोरोनावर मात केली आहे.

सध्या तालुक्यात कोरोनाचे ९३ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १३०८ रुग्ण झाले असून ११५६ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५९ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

# कुठे कुठे ठेवणार पोलीस बंदोबस्त, पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे पोलीस देखील हतबल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शनिवार -रविवार म्हटले ते पावसाळ्याच्या दिवसात पर्यटकांची मोठी रांग पनवेल तालुक्यातील परिसरातील गाढेश्वर धरणाकडे लागते. त्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आलेला असला तरी देखील पर्यटक विविध वाटा शोधत नदी आणि धरण परिसरात येत असतात. त्यामुळे कुठे कुठे पोलिस बंदोबस्त ठेवायचा हा प्रश्न पोलिसांना पडला आहे.

पोलिसांचे दैनंदिन काम सुरू आहे. लॉकडाऊनचा बंदोबस्त देखील सुरू आहे. त्यातच पनवेल मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामांतराचा वाद सुरू आहे. तिकडे देखील पोलिसांचे लक्ष आहे. असे असताना देखील पावसाळा सुरू झाल्याने गाढेश्वर धरण, मोरबे धरण, माची प्रबळ याठिकाणी पोलिस बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे. लॉकडाउन शिथिल करण्यात आल्याने पर्यटकांची मोठी गर्दी गाढी नदीच्या परिसरात होताना दिसून येत आहे. नेरे- वाजे, मोरबे परिसरात येणाऱ्या वाहनांची पोलीस कसून तप-



ासणी करत आहेत. शेकडोंच्या संख्येने दुचाकी गाड्या, चारचाकी गाड्या धरणाच्या परिसरात फिरण्यासाठी आणि मौजमजा करण्यासाठी येत आहेत. अनेक वाहनांना पोलीस आल्या पावली परत पाठवत आहेत.

त्यामुळे पर्यटक चोरवाटा शोधून धरणाच्या परिसरात जातात. तर काहीजण शांतीवन-नेरे पाडा अशा नदीकिनारी निसर्गाच्या वातावरणात जाताना दिसून येत आहेत. २० जून रोजी रविवारी नेरे पाडा -आदिवासी वाडी जवळील नदीत बाहेरून काही तरुण पोहायला आले होते. यावेळी एक तरुण वाहत जात असताना गावातील सतीश रोडपालकर याने पोहत जाऊन त्याला वाचवले.

पर्यटकांची मोठी संख्या या परिसरात मौजमजा करण्यासाठी येत असल्याने पोलिसांनी देखील कुठे कुठे बंदोबस्त ठेवायचा असा प्रश्न त्यांना पडला आहे. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे व वाट मिळेल तिकडे पर्यटक नदीत जात असल्याने पोलीस देखील हतबल झाले आहेत. पर्यटन स्थळांवर जाण्यासाठी बंदी घालण्यात आलेली असली तरीदेखील मद्याच्या नशेत काहीजण वाहन चालवत अपघाताला आमंत्रण देताना दिसून येत आहे. शनिवार-रविवारी वाहनांची संख्या प्रचंड वाढत असल्याने नवीन पनवेल, सुकापूर, आकुर्ली, नेरे परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला नागरिकांना सामोरे जावे लागते. याचा त्रास स्थानिकांना होत आहे.

रविवारी सायंकाळच्या सुमारास नेरेपाडा -आदिवासी वाडी येथील नदीवर काही तरुण पोहायला आले होते. यावेळी एक तरुण नदीत वाहत चालला होता. प्रसंगावधान राखून त्याला गावातील सतीश रोडपालकर यांनी बाहेर काढले. आणि त्याचा जीव वाचवला. पोलीस बंदोबस्त असल्याने पर्यटकांना माघारी जावे लागत आ-हेत. त्यामुळे वाट मिळेल तिकडे आणि पाणी दिसेल तिकडे पर्यटक रवाना होत आहेत. मात्र अनेक पर्यटकांना पाण्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे दरवर्षी गाढी नदी परिसरात पर्यटकांचा बुडून मृत्यू होतो.

# सुधागड-पाली पंचायत समितीच्या इमारत अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड-पाली पंचायत समितीच्या इमारत धोकादायक स्थितीत असून या इमारतींना दुरुस्तीची प्रतीक्षा आहे.

पंचायत राज व्यवस्थापनात जिल्हा परिषद व ग्रामपंचायत या दोघांमध्ये काम करणारी पंचायत समिती कार्यालय महत्त्वाचा दुवा आहे. या कार्यालयाची इमारत कशी असावी? कारणा या कार्यालयात गावातील प्रश्न येथून सोडविले जातात. त्याच पंचायत समिती कार्यलयाची इमारतच दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असेल तर काय सांगावे कारण शितावरुन भाताची परिक्षा केली जाते.

सुधागड-पाली पंचायत कार्यालयाच्या इमारत अनेक वर्षापासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे.दुरुस्ती बाबत प्रशासन मात्र उदासीनता असल्याचे दिसुन येत आहे. सुधागड-पाली पंचायत समितीच्या इमारतीला इमारतीचे उद्घाटन १० सप्टेंबर १९९८रोजी झाले. या इमारतीला २३ वर्ष झाले आहे.आज ही इमारती दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत.

तसेच पंचायत समितीची इमारत आहे. भिंतींना तडे गेल्या धोकादायक स्थितीत आहे. तसेच इमारतीच्या छाताचे सिमेंट पडल्याने लोखंडी सलई दिसत आहेत. अक्षरशः इमारती धोकादायक झाले असल्याचे दिसत आहे. संबंधित विभाग दुर्घघटनेची वाट पाहते का? असा सवाल विचारले जात आहे. आखादी दुर्घटना घडण्यापूर्वी त्याच्यावर उपाय योजना करावी अशी मागणी होत आहे.

# माथेरान घाटरस्त्यातील अति धोकादायक दरडी काढून टाकाव्यात : स्थानिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशातील पर्यटनस्थळांच्या तुलनेत पर्यटकांचा आकर्षणाचा केंद्रबिंदू म्हणून माथेरानची ओळख निर्माण झाली आहे त्यामुळे इथे सातत्याने पर्यटकांचा मोठया प्रमाणावर भरणा पहावयास मिळतो. अवघड नागमोडी वळणाचा चढावाचा घाटरस्ता आणि याच मार्गावरील धबधब्याचा रमणीय देखावा मनाला अगदी ताजेतवाने करतो. पावसाने न्हाऊन निघालेल्या हिरव्यागार डोंगराच्या रांगा आणि त्यातच डोंगर द-यांवरून वाहणारे शुभ्र फेसाळ पाणी तर खूपच उंचीवरून पडणारे जलप्रपात मन अगदी प्रफुल्लित करतात.अनेकदा पर्यटक हे नयनरम्य दृश्य पाहण्यासाठी इथल्या निसर्गाशी एकरूप होण्यासाठी खाजगी अथवा स्वतःच्या वाहनाने न चुकता पावसाळ्यात येत असतात.



परंतु ह्या घाट मार्गावर काही ठिकाणी खूपच धोकादायक दरडी केव्हाही कोसळण्याच्या गर्ते त दिसत आहेत.त्यामुळे मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्थानिकांनी याबाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेकदा निवेदने दिलेली आहेत. परंतु अद्याप काही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. दरवर्षी पावसाळ्यात या घाटरस्त्याच्या भागात दरडी कोसळत असतात. सुदैवाने आजवर कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. ज्या ज्या ठिकाणी निसटत्या मोठं मोठया दरडी आहेत त्या वेळीच काढून टाकणे गरजेचे आहे अन्यथा मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. दोन दिवसांपूर्वी दस्तुरी येथील चांगभले मंदिराच्या पहिल्या वळणावर मोठी दरड कोसळली होती त्यामुळे वाहतूक व्यवस्था तात्पुरती बंद करण्यात आली होती त्यामुळे नागरिकांना पायपीट करावी लागली होती. याच ठिकाणी दुसऱ्या वळणाच्या जागी सुध्दा भली मोठी धोकादायक दरड कोसळण्याच्या स्थितीत आहे. अशा दरडीना संरक्षक जाळी सुध्दा तग धरू शकत नाही त्यासाठी लवकरात लवकर या दरडी संबंधीत खात्याने काढून टाकाव्यात आणि जुम्मा पट्टी ते वॉटर पाईप स्टेशन या मुख्य भागातील धोकादायक दरडींना संरक्षक जाळ्या बसविण्यात याव्यात अशी मागणी केली जात आहे.

# नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील साहेबांचेच नाव देणार ; राजेंद्र पाटील उतरले मैदानात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडको आस्थापना च्या वतीने उभारण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव कुणाचे द्यावे? याचा वाद सध्या भलताच चिघळला आहे. प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्र मात्र नवी मुंबई विमानतळाला माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांचेच नाव देणार या भूमिकेवर ठाम आहेत. कुठला राजकीय पक्ष काय भूमिका घेतो? याकडे जराही लक्ष न देता केवळ प्रकल्पग्रस्त बांधवांची अस्मिता आणि दैवत असणारे दि बा पाटील यांच्या नावासाठी आपापल्या पक्षाच्या भूमिका खुंटीला टांगून भूमिपुत्र या आंदोलनामध्ये उतरले आहेत. २४ जून रोजी दी बा पाटील यांच्या जयंतीच्या औचित्याने प्रकल्पग्रस्त आणि भूमिपुत्र बांधव सिडको कार्यालयाला घेराव घालणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी वहाळ येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये रविवार दिनांक २० जून रोजी जनतेचा आवाज या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र महादेव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली.



वहाळ, बामण डोंगरी, मोरावे, जावळे गणे-शपुरी आणि उलवे नोड येथील नागरीक मोठ्या संख्येने या बैठकीला उपस्थित होते. विशेष म्हणजे शेतकरी कामगार पक्षाने सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाला दुजोरा दिला असला तरी देखील दि बा पाटील साहेबांचा सच्चा समर्थक या नात्याने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील या आंदोलनात उतरले आहेत. यावेळी प्रसिद्धिमाध्यमांशी बोलताना राजेंद्र पाटील म्हणाले की. माजी खासदार लोकनेते दि बा पाटील हे प्रकल्पग्रस्तांचे दैवत आहेत, भूमिपुत्रांचे कैवारी आहेत, आमचे उद्धार कर्ते आहेत. त्यांचे नाव प्रकल्पग्रस्तांच्या अंतःकरणात कोरले आहे. या आंदोलनात कोणीही कुठल्याही पक्षाचा कार्यकर्ता म्हणून सहभागी होत नाहीये तर दि बा पाटील साहेबांचे निस्सीम चाहते या भूमिकेतून प्रत्येक जण आंदोलनात उतरत आहे. येत्या २४ जूनला प्रशासनाने कितीही विरोध केला तरी मोठ्या संख्येने आंदोलनात आम्ही उतरणार आहोत. ज्या दीबांनी आपल्यासाठी रक्त सांडले, त्यांचे नाव देण्यासाठी आपण दोन तास काढलेच पाहिजेत. यावेळी उलवे नोड मधील अनेक सेवाभावी संघटनांनी राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनात सहभागी होणार असल्याचे सांगितले. मो का मढवी गुरुजी यांनी प्रास्ताविक केले. रमेश दापोलकर, अमित मुंगाजी, जगदीश पारींगे, गजानन शिरढोण कर, सीताराम शेठ नाईक, प्रमोद कडू, प्रितम नाईक आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे उलवे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक श्री. महादेव बाळाराम म्हात्रे यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**१. भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

<table>
<tr><th rowspan="2">गावाचे नाव /संचिका क्र.</th><th rowspan="2">निवाडा क्र.</th><th rowspan="2">संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र.</th><th rowspan="2">संपादित क्षेत्र (हे. आर)</th><th colspan="4">इरादित भूखंडाचा तपशील</th></tr>
<tr><th>नोड</th><th>सेक्टर क्र.</th><th>भूखंड क्र.</th><th>क्षेत्र (चौ. मी.)</th></tr>
<tr><td>वहाळ</td><td>४३९</td><td>२१७/२</td><td>०-३१-०</td><td>उलवे</td><td>१३</td><td>B-4</td><td>३००</td></tr>
<tr><td>गव्हाण</td><td>४९४</td><td>१९३/४<br>१९६/१</td><td>०-१२-०<br>०-२१-५</td><td rowspan="2">उलवे</td><td rowspan="2">१९</td><td rowspan="2">२९६</td><td rowspan="2">४००</td></tr>
<tr><td>खारकोपर</td><td>५२ ब</td><td>४/१४</td><td>०-१३-९</td></tr>
</table>

शासनाने घेतलेल्या निर्णयानूसार साडेबारा टक्के योजने अंर्तगत **भूधारक श्री महादेव बाळाराम म्हात्रे** यांना **७०० चौ.मी.** पात्रता मंजूर करण्यात आली आहे व **दि. १८/०५/२०११** रोजीच्या सोडतीद्वारे **भूखंड क्र. बी-४, सेक्टर-१३, क्षेत्र-३०० चौ.मी.** व **दि. १४/०३/२०१२** रोजीच्या सोडतीद्वारे **भूखंड क्र. २९६, सेक्टर-१९, क्षेत्र-४०० चौ.मी.** इरादित करण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या **भूधारक श्री. अंकुश सुंदर पाटील** यांनी सह दुय्यम निबंधक यांच्या कडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ **श्रीमती सुगंधा देवनाथ पाटील** यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ट ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील मूद्दा क्र. ii अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र, सेक्टर क्र, व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **भूखंड क्र. बी-४, सेक्टर-१३, क्षेत्र-३०० चौ.मी. व भूखंड क्र. २९६, सेक्टर-१९, क्षेत्र-४०० चौ.मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच **मौजे वहाळ, सं.नं/हि.नं-२१७/२, क्षेत्र ०-३१-० हे.आर. मौजे गव्हाण सं.नं/हि.नं- १९३/४, १९६/१, एकूण क्षेत्र-०-३३-५ हे.आर, व मौजे खारकोपर सं.नं/हि.नं-४/१४, क्षेत्र-०-१३-९ हे.आर** या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| श्री. अंकुश सुंदर पाटील | श्रीमती. सुगंधा देवनाथ पाटील |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोडनुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|
| श्रीमती. सुगंधा देवनाथ पाटील |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडे बारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत /तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी- बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्यत्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबददल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधीत गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येईल.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/११२/२०२१-२२


# अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयात जागतिक योग दिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा सामान्य रुग्णालयातील आयुष विभागामार्फत आणि जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम, अलिबाग - रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जागतिक योग दिवस चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, अधिसेविका श्रीमती जयश्री मोरे, जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ. अमोल भुसारे, मानसोपचार तज्ञ डॉ. अर्चना सिंह, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ. समीर पोटे, योग प्रशिक्षक श्रीमती सीमा रेजा आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. अमोल भुसारे यांनी मानसोपचार आणि योग याचे महत्व समजावून देऊन आनंदी राहण्यासोबत तणावविरहित जीवनासाठी योग किती आवश्यक आहे, याबाबत सविस्तर माहिती दिली. मानसिक आजारापासून दूर राहण्यासाठी नियमित योग सर्वांनी करावा, असे आवाहनही त्यांनी सर्वांना केले. योग प्रशिक्षक श्रीमती सीमा रेजा यांनी उपस्थितांकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले तसेच उपस्थित सर्वांनी योग करण्याचा संकल्पही केला.

# सिडकोने अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या झाडांची छाटणी करावी

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

द्रोणागिरी नोड परिसरातील नवघर रेल्वे क्रॉसिंग उड्डाण पुलाच्या दोन्ही रस्त्याच्या दुतर्फाजवळ वाढलेल्या झाडांची छाटणी करण्याचे काम सिडकोच्या अधिकारी वर्गाने हाती न घेतल्याने सदर झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्या आ-हेत. त्यामुळे पावसात रात्री - अपरात्री मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. तरी सिडकोच्या अधिकारी वर्गाने रस्त्यावर आलेल्या झाडांची छाटणी करावी अशी मागणी प्रवाशी नागरीक करत आहेत.

कोरोना संकटाचे कारण पुढे करत सिडकोच्या अधिकारी वर्गाने द्रोणागिरी नोड परिसरातील अनेक कामांकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या परिसरात उद्भवणाऱ्या समस्यांचा सामना नाहक प्रवाशी, नागरीक यांना सहन करावा लागत आहे. त्यात उरण पुर्व विभागातील नागरिकांचा तसेच द्रोणागिरी नोड परिसरातील नागरिकांचा, चाकरमान्यांचा रहदारीचा मार्गक्रमण असणाऱ्या नवघर रेल्वे क्रॉसिंग उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूंच्या रस्त्यावर सध्या मोठ्या प्रमाणात काटेरी झाडे वाढली आ-हेत. सदर झाडांच्या फांद्या या रस्त्यावर आल्याने उड्डाण पुलावरून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना अपघाताला कारणीभूत ठरत आहेत.

तरी सिडकोच्या अधिकारी वर्गाने कोरोनाच्या संकटातून स्वतःला सावरुन जनहितार्थ नवघर रेल्वे क्रॉसिंग उड्डाण पुलाच्या दोन्ही बाजूंच्या रस्त्यावर आलेल्या झाडांच्या फांद्याची छाटणी करण्याचे काम हाती घ्यावे अशी मागणी प्रवाशी नागरीक करत आहेत.